# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

## कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर

**५३९ ,कसबा करवीर राजेंद्र नगर कोल्हापूर- ४१६ ००४**

क्र.कोविमं/उमा/प्रात्य/ऑनलाईन/ ६-०१
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक- १२/०३/२०२२

प्रति,
प्राचार्य,
माहिती तंत्रज्ञान,ऑनलाईन परीक्षा घेणारी
कनिष्ठ महाविद्यालये.
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

विषय - **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च/एप्रिल २०२२ "माहिती तंत्रज्ञान"(I.T.) व "सामान्यज्ञान"(G.K.) या विषयाचे गोपनीय साहित्य घेणेसाठी I.T. शिक्षक पाठविणेबाबत.**
संदर्भ - पत्र क्र.रा.मं/ऑनलाईन/आय.टी./जी.के./ ११/ दिनांक ०३ जानेवारी २०२२.

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च/एप्रिल २०२२ च्या "माहिती तंत्रज्ञान"(I.T.) व "सामान्यज्ञान"(G.K.) या विषयाच्या ऑनलाईन परीक्षा या आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयामध्ये होत आहेत. माहिती तंत्रज्ञान विषयाची ऑनलाईन परीक्षा दिनांक ३१ मार्च २०२२, ०१ व ०४ एप्रिल,२०२२ रोजी सकाळी १०:३० ते दुपारी १:३० आणि दुपारी ३:०० ते ६:०० तसेच सामान्यज्ञान विषयाची ऑनलाईन परीक्षा दिनांक ०१, ०४ व ०५ एप्रिल,२०२२ रोजी सकाळी १०:३० दुपारी १:०० व दुपारी ३:०० ते ५:३० या प्रमाणे एकूण २ सत्रामध्ये आयोजित करण्यात आली आहे.

सदरच्या परीक्षेचे साहित्य आपणांस जिल्हानिहाय सातारा, कोल्हापूर, सांगली, याप्रमाणे अनुक्रमे दिनांक १४/०३/२०२२, १५/०३/२०२२, १६/०३/२०२२ याप्रमाणे देण्यात येणार आहे. सदर दिवशी सकाळी १०:०० ते दुपारी १:०० या वेळेत साहित्य वितरण करण्यात येणार आहे. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा माहिती तंत्रज्ञान (I.T) विषय शिक्षकच मंडळ कार्यालयात सकाळी १०:०० वाजता साहित्य स्विकारणेसाठी अधिकार पत्र घेऊन एक प्रतिनिधी पाठवून देणेत यावे. सदर दिलेल्या वेळेतच उपस्थित रहावे.

सदर परीक्षेचे परीक्षोत्तर साहित्य परीक्षा झाल्यानंतर शुक्रवार दिनांक ०८/०४/२०२२ रोजी कार्यालयात जमा करावयाचे आहे याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

: d/Jadhav Minakshi/Paripatrak pg. 20